7

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर  **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0341  **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/05/2025 19:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 28/04/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/05/2025
   **Time From (वेळेपासून):** 15:24 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 13/05/2025  **Time (वेळ):** 14:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 042

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/05/2025 18:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी,इचलकरंजी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** उमेश निशीकांत माळी

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** निशीकांत माळी

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 13/442,काडापुरे तळ, इचलकरंजी, ,शिवाजी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | 13/442,काडापुरे तळ, इचलकरंजी, ,शिवाजी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9881814398

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत ताराचंदजी राठी | | वडील का नाम : ताराचंदजी राठी | 1. सांगली रोड,बिग बझार जवळ, इचलकरंजी,शिवाजी नगर, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक - 13/05/2025

मी उमेश निशीकांत माळी, वय -42 वर्षे रा.13/442,काडापुरे तळ,इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर मो.नं.9881814398 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 28/04/2025 रोजी सकाळी 11.21 वा चे दरमयान अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांचे मोबाईलवर फोन करून, माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगीतली की, मी गव्हर्मेंट इलेक्ट्रीक कॉन्ट्रक्टर असुन माझा लायसंन्स नंबर म.ठे.नं.24521 असा आहे. माझे मालकीची मे.शिवम इलेक्टिकल्स नावाची फर्म 2010 पासून सुरु असुन त्या मार्फतीने मी इलेक्ट्रीक फिटींगची कामे घेत असतो. मी इचलकरंजी येथील चंद्रकांत भागाजे यांचे मालकीच्या सि.स.नं.18052 अभय डेअरी मागे, सांगली रोड इचलकरंजी येथील सरोज रेसीडन्सी या अर्पाटमेंट मधील 18 फलॅटच्या विज जोडणीचा ठेका संबधीत मालकाकडून घेतलेला आहे. वीज जोडणी मंजुरी करीता लागणारे अर्ज व अवश्यक ती कागदपत्रे जोडून महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी उपविभाग, इचलकरंजी येथे दिलेला आहे. तेथून तो अर्ज कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं, इचलकरंजी यांचेकडे मंजुरीसाठी आलेला आहे. हा अर्ज मंजुर होणेसाठी दिनांक 24/04/2025 रोजी मी तेथील कार्यकारी अभियंता प्रशांत राठी यांना भेटलो असता, त्यांनी माझेकडे 18 फ्लॅटचे प्रत्येकी 5000/- प्रमाणे एकुण 90000/- रु दयावे लागतील तरच प्रकरण मंजुर होईल, असे म्हणुन माझेकडे 90,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना पैसे जास्त होतात काहीतरी कमी करा, असे म्हणालो असता, त्यांनी पैसे कमी करण्यास नकार दिला. त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा करून तुम्हाला येवुन भेटतो असे सांगितले होते. अशी तक्रार सांगुन राठी साहेब यांना मी दिनांक 28/04/2025 रोजी दुपारी 2.30 वा चे सुमारास त्यांचे कार्यालयात भेटण्यास जाणार असलेचे सांगीतले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी इचलकरंजी येथील कबनुर ओढा ते पंचगंगा फॅक्टरी रोडवरील कोल्हे मळा येथे रिकाम्या जागी येण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी त्या त्यांचे स्टाफ व पंचासह तेथे पोहचत असल्याचे सांगितले. दुपारी 03.10 वा चे सुमारास पाटील मॅडम त्यांचे स्टाफ व पंचासह कोल्हे मळा येथे आल्या. त्यांनी माझी पंच नंबर सतीश माळवी व पंच नं.2 बाजीराव सुतार तसेच स्टाफ यांचेशी ओळख करून दिली. त्यावेळी मी वरील प्रमाणे तक्रारीचा अर्ज त्यांचेकडे दिला. मॅडम यांचे सांगणेवरुन माझी तक्रार मी पंचासमक्ष सांगितली. त्यानंतर मॅडम व पंचानी माझी लेखी व तोंडी तक्रार एकच असल्याची खात्री केलेनंतर त्यावर सहया केल्या. पाटील मॅडम यांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगीतले. मॅडम यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन महाराश्ट्र विद्युत वितरण कंपनी उपविभाग, इचलकरंजी येथील कार्यकारी अभियंता प्रषांत राठी यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना दिल्या व मॅडम यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड घालुन, त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाषण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करून दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर दुपारी 03.24 वाजता चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 माळवी यांना माझेकडील मोटर सायकल होंडा शाईन गाडी नं.09सी झेड.4046 वरून महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी उपविभाग, इचलकरंजी कार्यालय येथे पाठवुन दिले. आम्ही तेथे पोहचल्यानंतर त्यांचे कार्यालयात जावुन पाहीले असता राठी साहेब तेथे नव्हते म्हणुन, मी त्यांना माझे वरील मोबाईल नंबर वरून राठी साहेब यांचे मोबाईल नंबर 7875769008 वरती फोन केला व स्पिकर ऑन केला त्यावेळी राठी साहेब हे माझे लेआउटचे कामाविषयी बोलुन ते थोडयावेळात ऑफीसला येत असल्याचे सांगितले. आम्ही काहीवेळी त्यांची वाट पाहत बसलो काहीवेळाने राठी साहेब यांचा ते कार्यालयात आलेचा फोन आल्याने, मी त्यांची कार्यालयात जावुन भेट घेतली. त्यावेळी आमचेत माझे इलेक्टी्रक कामाचे तसेच कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत या अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी " तुम्ही बोलला, परवा पाच हजार प्रमाणे... पर कनेक्शन 90 हजार होतात साहेब..." असे म्हणालो. त्यावर कार्यकारी अभियंता राठी "मग हे किती काढता बघा ना..." असे

बोलले. त्यावेळी मी " आपण काय करायचं सांगा मग..."असे म्हणालो. त्यावेळी राठी " काय तुमचं...काय त्यावेळी मी "काय करायच सांगा मग.."असे बोललो. त्यावेळी राठी "काय तुमच".... "काय दयायच ते करा"...असे म्हणाले. त्यानंतर राठी साहेबांनी मला माझे कामाची फाईल त्यांचे कार्यालयातील दुसरे कक्षातुन घेवुन येण्यास सांगितली. मी तेथे जावुन तेथील कर्मचारी यांना माझे फाईलबाबत विचारणा केली असता, त्यांनी फाईल पाटणकर साहेबांनी तयार केल्याचे सांगुन फाईल कोठे आहे माहिती नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी पुन्हा राठी साहेबांना येवुन भेटलो. त्यावेळी आमचेत फाईलचे तसेच त्यावर सही करायचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी मी "ते नव्ह.... काय सांगा की विषय संपवूया.." असे म्हणालो. त्यावेळी राठी "आलो घरला जावून येतो..." असे बोलले. त्यावेळी मी त्यांना गुरूवारी आहे का ? असे विचारले त्यावेळी त्यांनी ते गुरूवारी असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन आलो. व व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 05.02 वाजता बंद केला.त्यानंतर मी घडलेली हकीकत पाटील मॅडम यांना सांगितली. कार्यकारी अभियंता राठी यांनी माझेकडे सरोज रेसिडेन्सी मधील एकूण 18 फ्लॅट करीता प्रत्येक फ्लॅट करीता 5000 रू.प्रमाणे 90,000 रू.लाचेची यापुर्वी मागणी केली होती त्याप्रमाणे त्यांनी लाच मागणीच दुजोरा दिला. तसेच त्यांना मी काय करायचं सांगा असे विचारलेवर राठी यांनी काय दयायचं ते करा असे म्हणून लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले. परंतु लाच रक्कमेबाबत स्पष्टता नसल्याने कार्यकारी अभियंता राठी यांची पुन्हा पडताळणी करण्याचे पाटील मॅडम यांनी सांगितले. त्यानंतर पाटील मॅडम यांनी चालु कारवाई तात्पुरती स्थगीत केली.

दिनांक 08/05/2025 रोजी दुपारी 3.00 वा चे सुमारास मी राठी साहेब यांना भेटणेस जाणार आहे, तरी तुम्ही इचलकरंजीला जाताना रूकडी गावचे हददीत रोडकडेला असले बाळुमामा मंदिर परिसरात या असे फोन करून पाटील मॅडम यांना सांगितले. त्याप्रमाणे पाटील मॅडम त्यांचा स्टाफ, पंच असे सायंकाळी 04.00 चे सुमारास तेथे आले. त्यानंतर पाटील मॅडम यांनी मला कार्यकारी अभियंता राठी यांचे लाच मागणीच्या अनुषंगाने परत पडताळणी करीता सर्व आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 04.10 वाजता चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 माळवी यांना माझेकडील मोटर सायकल वरून महाराश्ट्र विद्युत वितरण कंपनी उपविभाग, इचलकरंजी कार्यालय येथे पाठवुन दिले आम्ही तेथे पोहचल्यानंतर त्यांचे कार्यालयात जावुन राठी साहेबांना भेटलो. त्यावेळी आमचेत माझे सरोज रेसीडेन्सीच्या कामाच्या अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी मी "ओ साहेब काय तरी ठरवा विषय सपंवा मला पुढ काम करायची आहेत अजुन" असे म्हणालो. त्यावेळी राठी "कर जे तुला करायचे असेल, ते कर जाउदे" असे म्हणाले. त्यावेळी मी "मी बोलु काय नव्वद हजार काय होणार नाही पन्नास हजार, पन्नास हजार करू काय?" असे म्हणालो. त्यावेळी राठी "तुला माहित आहे जास्त काय मागणार नाही " असे म्हणाले. त्यावेळी मी "पन्नास हजार करू?" असे म्हणालो. त्यावेळी राठी "तु तुझ पहिले बघ," "तेच्यानतंर मला काय दयायचे असेल ते देउन टाक, विषय सपंवून टाक" असे म्हणाले. त्यावेळी मी ठिक आहे असे म्हणालो. त्यानंतर पुन्हा आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी "पन्नास करतो" असे म्हणालो. त्यावेळी राठी " पन्नास पण नको, तीस कर.." असे म्हणाले. त्यावेळी मी "तीस करू.." असे म्हणालो. त्यावेळी राठी "कनेक्शनचे" असे म्हणाले. त्यावेळी मी घेवुन येवु जावु काय असे विचारले असता त्यांनी हुं असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना उदया आकरा वाजता येवु काय ? असे म्हणालो असता, त्यांनी ते उदया कोल्हापूर ला मिटींग ला जाणार आहे असे म्हणाले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन आलो त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 05.42 वाजता बंद केला. त्यानंतर मी घडलेली हकीकत पाटील मॅडम यांना सांगितली. कार्यकारी अभियंता राठी यांनी माझेकडे माझे कामाची फाईल मंजुर करणेकरीता तडजोडीअंती 30,000/- रूपयांची लाच मागणी केली आहे. सदरची लाच रक्कम मी त्यांना दिनांक 09/05/2025 रोजी जाणार असेलेने पाटील मॅडम यांनी यांनी चालु कारवाई तात्पुरती स्थगीत केली.

दिनांक 09/05/2025 रोजी मी व पाटील मॅडम फोनवरून एकमेकांचे संपर्कात होतो. दुपारी 3.55 वा चे सुमारास पाटील मॅडम त्यांचा स्टाफ व पंच असे कोल्हे मळा कबनुर येथे आले. मी ही तेथे आलो त्यावेळी पाटील मॅडम यांनी कार्यकारी अभियंता राठी यांचेवर आयोजीत केले सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यावेळी त्यांनी लाच रक्कम बाबत मला विचारणा केली, त्यावेळी मी माझेकडील 500/- रूपये दराच्या 60 चलनी नोटा असे 30,000/- रूपये हजर केले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी मला व पंचाना अॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात फिकट हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, केलेनंतर अॅंथ्रासिन लावलेले 30,000/- रूपये माझे पॅन्टचे पुढील बाजुच्या उजव्या खिशात ठेवले. त्यानंतर पुन्हा पाटील मॅडम यांनी सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 04.50 वाजता सुरू करून तो माझे शर्टचे आतमध्ये दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर मी व पंच माळवी असे माझेकडील मोटर सायकलने महाराश्ट्र विद्युत वितरण कंपनी उपविभाग, इचलकरंजी येथे जाण्यास निघालो. आमचे पाठोपाठ पाटील मॅडम, सापळा पथक, पंच नं.2 सुतार आले व महाराश्ट्र

विद्युत वितरण कंपनी उपविभाग, इचलकरंजी या परिसरात सापळा लावुन थांबले. त्यावेळी मी व पंच माळवी असे कार्यालयात जावुन राठी साहेब आहेत का ? हे पाहीले असता ते कार्यालयात नसुन, बाहेर अब्दुललाट गावी व्हिजीटसाठी गेले असुन त्यांना यायला वेळ लागणार असलेचे माझे फोनवरून त्यांना फोन केल्याने समजले. त्यामुळे आम्ही सर्वजण परत कोल्हे मळा येथे पुर्वी थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर सांयकाळी 05.44 वाजता बंद केला. पाटील मॅडम यांना मी घडलेली हकीकत सांगितली. तसेच राठी साहेबांना तिन चार दिवस सुट्टी असल्याने मला आता राठी साहेब हे दिनांक 13/05/2025 रोजीच कार्यालयात भेटतील असे सांगितल्याने, पाटील मॅडम यांनी यांनी चालु कारवाई तात्पुरती स्थगीत केली.

दिनांक 13/05/2025 रोजी मी व पाटील मॅडम फोनवरून एकमेकांचे संपर्कात होतो. सकाळी 11.55 वा चे सुमारास पाटील मॅडम त्यांचा स्टाफ व पंच असे कोल्हे मळा कबनुर येथे आले. मी ही तेथे आलो. त्यावेळी पाटील मॅडम यांनी कार्यकारी अभियंता राठी यांचेवर आयोजीत केले सापळा कारवाईचे अनुषंगाने पुन्हा सर्व सुचना दिल्या. त्यावेळी पाटील मॅडम यांनी त्यांचेकडे दिनांक 09/05/2025 रोजी मी दिलेली 30,000/- लाच रक्कम सुरक्षीत ठेवलेली होती, ती लाच रक्कम काढुन पुन्हा मला व पंचाना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात फिकट हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, केलेनंतर अॅन्थ्रासिन लावलेले 30,000/- रूपये माझे पॅन्टचे पुढील बाजुच्या उजव्या खिशात ठेवले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर दुपारी 12.22 वाजता सुरू करून तो माझे शर्टचे आतमध्ये दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर मी व पंच माळवी असे माझेकडील मोटर सायकलने महाराश्ट्र विद्युत वितरण कंपनी उपविभाग, कार्यालय इचलकरंजी येथे जाण्यास निघालो. आमचे पाठोपाठ पाटील मॅडम, सापळा पथक, पंच नं.2 सुतार आले व महाराश्ट्र विद्युत वितरण कंपनी उपविभाग, इचलकरंजी या परिसरात सापळा लावुन थांबले. त्यावेळी मी व पंच माळवी असे कार्यालयात जावुन राठी साहेब यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी राठी साहेबांना मी सर आत येवु का ? असे म्हणुन त्यांचे केबीन मध्ये गेलो. त्यावेळी राठी साहेब काय म्हणता, असे म्हणाले. त्यावेळी मी " नाय..., तेच सरोज रेसिडेन्सीच घेवुन आलतो ओ पैसे" असे म्हणालो. त्यावेळी राठी हु.. असे म्हणाले. त्यावेळी मी "ते उगच..." असे म्हणालो. त्यावेळी राठी साहेब "दया इकड" असे म्हणाले. त्यावेळी मी " मोजुन घ्या" असे म्हणुन त्यांचेकडे त्यांनी मागणी केलेले 30,000/- रूपये माझे उजव्या हाताने दिले. त्यांनी ते पैसे उजव्या हाताने स्विकारून त्यांचे टेबलचे ड्राव्हर मध्ये ठेवले. त्यावेळी राठी साहेब मोजुन..., ते एन.एस.सी. आल नाही अजुन वाटत असे म्हणाले. त्यानंतर आमचेत कामचे अनुषंगाने बोलने चालु असताना, मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता, पाटील मॅडम त्यांचा स्टाफ व पंच तेथे आले. त्यावेळी स्टाफ मधील एका अंमलदाराने माझेकडील व्हाईस रेकॉर्डर 12.27 वाजता बंद केला. त्यानंतर पाटील मॅडम यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह कार्यकारी अभियंता प्रशांत राठी यांना ताब्यात घेतले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी राठी साहेब यांचे हाताची व त्यांनी ज्या ठिकाणी पैसे ठेवले त्या ड्राव्हरची पंचासमक्ष कार्यालयातील लाईट बद करून अंधारात अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता राठी साहेब यांचे हातावर व ड्राव्हर मध्ये फिकट हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सर्व कार्यवाही शिवाजीनगर पोलीस ठाणे इचलकरंजी, जि. कोल्हापूर येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी मी वीज जोडणीचे काम करत असले सरोज रेसीडेन्सी या अपार्टमेंट मधील 18 फ्लॅटचे वीज जोडणीचे फाईल मंजुरी करणे करीता महाराश्ट्र विद्युत वितरण कंपनी उपविभाग, इचलकरंजी येथे दिलेली होती. सदरचे काम तेथील कार्यकारी अभियंता प्रषांत राठी यांचेकडे होते. प्रशांत राठी यांनी फाईल मंजुरीकरीता सरोज रेसीडेन्सी मधील 18 फलॅटचे प्रत्येकी 5000/- प्रमाणे एकुण 90000/- रु दयावे लागतील तरच, प्रकरण मंजुर होईल असे म्हणुन माझेकडे अप्रमाणीकपणे 90,000/- रूपये मागणी केलेली होती. त्याप्रमाणे त्यांनी 90,000/- रूपये लाच मागणीस दुजोरा देवुन, तडजोडीअंती अप्रमाणीकपणे 30,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निपन्न झाले. त्यानंतर मागणी केलेली लाच रक्कम 30,000/- रूपये माझेकडुन बेकायदेशीरपणे स्विकारताना त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने, माझी प्रशांत ताराचंदजी राठी, वय - 49 वर्षे, व्यवसाय - नोकरी पद - कार्यकारी अभियंता, वर्ग - 1, महावितरण विभागीय कार्यालय, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर सद्या रा. उपकार रेसीडेन्सी प्लॅट नंबर 06, बिग बझार जवळ सांगली रोड इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर मुळ रा. धामनगाव, ता. धामनगाव, जि.अमरावती यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

SACHIN DINKAR PATIL(I (Inspector)) / 151010000402SDPM8401Y **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SACHIN DINKAR PA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402SDPM840